Vol 5 Issue 7 Aug 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850

Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 7 | Aug - 2015

# 'राग लक्षणं' – एक संक्षिप्त अभ्यास



शिरिष कडू
श्री. शिवाजी महाविद्यालय, अकोला.



***प्रस्तावना :–***

संगीत मुळातच एक क्रियात्मक कला आहे. परंतु भारतीय शास्त्रीय संगीत परंपरा सुदृढ सिध्दांतांवर प्रस्थापित असून त्याचा एक सुदिर्घ विकासक्रम आहे. कलेचे क्रियात्मक स्वरूप स्थिर झाल्यानंतरच सिध्दांत निश्चित होतात आणि तेच शास्त्रकार लीपीबध्द करतात. शिस्तीच्या कठोर परीसीमांमध्ये राहून सृजनात्मक प्रक्रिया करणे ही भारतीय शास्त्रीय संगीताची विशेषता आहे.

क्रिया आणि सिध्दांतामध्ये जे स्वाभाविक सामंजस्य सतत असते त्यामध्ये क्रिया परंपरेच्या प्रथम स्थानावर असते तर सिध्दांत त्याच्या सतत सहचरजन्य गौरवाचा स्वामी आहे. सिध्दांत क्रियेची प्रेरणा आहे. म्हणूनच सिध्दांतपत्राचे प्रतिपादन प्रत्येक युगाची अनिवार्यता आहे.

ऐतिहासिक दृष्टीकोनातून भरतांपासून आज पर्यंत प्रत्येक युगात महान विचारकांनी आपल्या युगानुरूप संगीत कलेच्या सैध्दांतिक पक्षाचे क्रिया – सापेक्ष प्रतिपादन केलेले आहे. या सर्व गोष्टींना अनुसरून 'राग लक्षण' हया भरतांनी दिलेल्या संकल्पनेची चर्चा प्रस्तूतशोध निबंधात केल्या जात आहे.

***संशोधनाची आवश्यकता :–***

भारतीय शास्त्रीय संगीताच्या सैध्दांतिक पक्षाची आजच्या संगीत शिकणा–या विदयार्थ्यांना नव्याने ओळख करून देण्याची गरज मला एक संगीत विषयाचा सहाय्यक प्राध्यापक या नात्याने वाटते. ते या कारणामुळे की, आज जग झपाटयाने पुढे जात आहे आणि प्रत्येक विषयामध्ये स्पर्धा वाढलेली आहे. प्रगतीचा हव्यास हे प्रगत मानवाचे चांगले लक्षण आहे. परंतु एखादया विषयामध्ये प्रगती करत असतांना त्या विषयाचा पाया हा मजबूतच असणे अनिवार्य आहे. कारण त्या विदयेचे किंवा कलेचे मुल्य टिकवून ठेवायचे असेल तर त्याची शुध्दता परखुन घेणे अतिशय गरजेचे असते कारण त्या विदयार्थांनी, कलाकारांनी केलेला अभ्यास हा पुढील पिढीसाठी तयार झालेला ठेवा (मेवा) ठरते.

***संशोधन साहित्य आणि पध्दती :–***

संबंधित विषयाला अनुसरून असलेले पुस्तके, मासिकांचा अभ्यास करून आलेले निष्कर्ष सुबक मांडणी करून सांगण्यात आलेले आहेत.

भारतीय संगीत हे राग प्रधान संगीत आहे. या संगीतातील कोणताही गीत प्रकार असो, जसे सुगम संगीत, नाठय संगीत, लोकसंगीत शास्त्रीय संगीत त्यामुळे हया सर्व प्रकारांमध्ये 'राग' ही विषयवस्तु अतिशय महत्वाची मानली जाते. त्यामुळेच 'राग' या संकल्पनेचा सर्वांगाने अभ्यास असणे गरजेचे आहे.

***राग लक्षणांबद्दल चर्चा :–***

राग ज्या विकसित अवस्थेतेने स्थिर झालेला आहे त्यामुळेच तो विशेष सामान्यांपासून भिन्न झालेला आहे. आणि त्यामुळेच त्याला भिन्न – भिन्न मानवेत्तर संज्ञांनी संबोधण्यात आलेले आहे. उदा. दिव्य पुरूष, महामंत्र ईत्यादी. हे कोणत्या रागाचे गुण विशेष नाहीत तर हया सामान्य उपमा आहेत ज्या रागामध्ये असलेल्या अदभुत रसमयतेच्या बोधक आहेत. रागाचे रसमय रूप हे सुक्ष्म आहे जे स्थूल तत्वाशिवाय अभिव्यक्त करू शकत नाही. एखादया व्यक्तीला ज्या गुणांमुळे महामानव संबोधण्यात येते ते त्याच्या मुळ शरीरापासून वेगळे नाहीत. ज्या प्रमाणे साधारण माणसाचे मुर्त्तरूप एक सारखे आहे हात, पाय,

नाक, कान ई. शारीरिक अंगाचा संख्या समाज आहे त्याच प्रमाणे अपार रस जन्य रागांचा आधार त्याचे स्वरच आहेत. त्या स्वरांना प्रयोगाच्या दृष्टीने ज्या ज्या उपमा दिल्या जातात त्यालाच राग लक्षणे असे संबोधण्यात आले आहे. यादृष्टीने राग लक्षणांची संख्या दहा आहे. परंतु रागाच्या सुक्ष्म तत्वांना सुध्दा लक्षणांमध्ये जोडले तर याची संख्या अधिक वाढेल.

भरत यांनी मांडलेला प्रत्येक सिध्दांत निर्विवाद पणे स्विकारल्या गेला आहे ज्याला आपण प्रत्येकच विषयाच्या सुरवातीचा आधार म्हणून घेवू शकतो. भरतांनी जाती – लक्षणांचे विश्लेषण खालील प्रमाणे मांडले आहे.

ग्रहांशो तारमन्द्रौ च न्यासोपन्यास एव च
अल्पत्व च बहुत्वं च ष्षोवौविते तथा ।
नाटयशास्त्र – २५, २७
या नुसार जाती आणि राग यांचे एकूण दहा लक्षण मानली गेलीत.

(१) ग्रह , (२) अंश , (३) न्यास , (४) अपन्यास , (५) तार , (६) मन्द्र , (७) अल्पत्व , (८) बहुत्व , (६) औत्व आणि (१०) षोत्व.

शारंगदेवांनी जेव्हा संगीत रत्नाकर ची रचना केली तेव्हा जातीच्या तुलनेत राग विषयक विवेचन अभिप्रेत होते. त्यांनी या दहा लक्षणांमध्ये संन्यास, विन्यास आणि अत्तरमार्ग असे तीन लक्षण आणखी जोडले. आजच्या संदर्भामध्ये स्पर्श स्वर, कण स्वर आणि अन्य स्वर लगाव पध्दती, आर्विभाव, तिरोभाव हे सुध्दा राग लक्षणांमध्ये जोडले जाऊ शकतात.

काही विव्दानांचे असे म्हणणे आहे की जातींच्या हया लक्षणांनाच रागाचे दहा लक्षण मानावे कारण जातींनाच रागाची जननी म्हटले आहे. जाती, रागाची जननी आहे किंवा नाही परंतु या संबंधामध्ये परंपरा आणि काही असे शब्द आहेत की ज्यांचा आधारे राग आणि जाती यांचा पुर्वापार असलेला संबंध स्पष्ट होवू शकतो.

जाती सिध्दांताचे उल्लंघन करून भरताने तत्कालीन नविन स्वरावलीना मुळ जातींमध्ये सम्मिलीत करून घेतले नाही परंतु त्यांना राग – जाती म्हणून नविन संबोधन दिले. त्यांचे असे मानने जाती आणि राग संबंधाचे कारण निश्चित स्वरूपात आहे. दुसरी गोष्ट, कोणतीही कलात्मक उद्भावना आपल्या पुर्वीची कडी निश्चित असते. आणि हेच दोन अत्यंत्य ठोस कारण आहेत. संभवतः याच कारणांमुळे जवळपास सर्वच विव्दान जातींना रागाची जननी मानतात. राग आणि जातींमध्ये जन्य आणि जनकाचा संबंध असो किंवा नसो परंतु दोनही सुदीर्घ परंपरेचे अतिभक्त घटक आहेत हे सिध्द होते.

राग परंपरेचे संचालक मतंगांनी काडीचाही उल्लेख केला नाही परंतु मुळ दहा लक्षणांना जातिचे लक्षण म्हणून आपल्या पुस्तकात स्थान दिले. शारंगदेवांनी रागलक्षणांना जातीचे लक्षण म्हणून स्विकृती अवश्य दिली. हया विवेचनावरून जाती आणि राग या दोन्ही मध्ये दश – लक्षणांचे महत्व सारख्या प्रमाणात दिसून येते.

***ग्रह :—***

राग किंवा जाती या मुळ लक्षणांपैकी ग्रह हे सर्व प्रथम लक्षण मानल्या जाते. भरत ग्रहाचे बाबतीत खालील प्रमाणे वर्णन करतात.

ग्रहस्तु सर्वजातिनामंश एव ही किर्तोतः ।
यत्प्रवृत भवेद्गानं सोंशो ग्रह विकल्वितः ।।

या नुसार भरत एकाच स्वराला ज्या पासून जातीचा आरंभ होतो ‘ग्रह’ आणि ‘अंश’ असे संबोधतात तेव्हाच्या मुळ अठरा जातींच्या स्वर विस्तारामध्ये कुठपर्यंत या गोष्टीला व्यवहारीकता मिळाली हा एक स्वतंत्र विश्लेषणाचा विषय आहे. सामान्यतः ‘ग्रह’ स्वर हा अंश आहे हे निश्चित सांगता येणार नाही. प्रत्येक जाती साठी आधार स्वर निश्चित होता आणि तोच स्वर ग्रह स्वर म्हणून संबोधण्यात आला.

वर्तमान राग – चलना नुसार सर्व रागांचा आधार स्वर षेज् आहे. परंतु बरेच राग असे आहेत की ज्यांच्या स्वरविस्तारामध्ये षेजा (ग्रहस्वराची) ची भूमिका दुसरा स्वर ग्रह स्वर म्हणून निभवतो. कल्याण, बिहाग, भीनपलासी ई. असे बरेच राग आहेत की ज्यांचा आरंभिक किंवा आधार स्वर मंद्र निषाद दिसून येतो. जयजयवंती रागाचे उदाहरण बधितल्यास आधार स्वर हा मंद्र धैवत दिसून येतो. परंतु हा मुख्य नियम नाही त्यामुळे जास्तीत जास्त रागांचा ग्रह स्वर षेज हाच मानला जातो.

***अंश :—***

प्रत्येक रागात लागणारे सर्व स्वर समान नसतात. एक स्वर असा असतो की त्याला प्रत्येक दृष्टीने महत्वाचा मानला जातो. या विचारानुसार भरतांनी अश्या स्वराला अंश स्वर अशी संज्ञा देवून संबोधित केले. याच स्वराला – मुळ, बिज किंवा आत्मा असे म्हटले आहे. आणि वर्तमान संदर्भमध्ये यालाच वाही स्वर असे म्हटले गेले. याबाबत सर्वांचा अभिप्राय सारखाच आहे. अर्थातच रागाचा ‘वादी’ म्हटल्या गेलेला स्वर त्या रागाचा आत्मा असतो आणि त्यामधील निहीत रस रागाचा बोधक असतो. भरतांनी अंश स्वराबद्दल खालील प्रमाणे म्हटले आहे.
अनेक स्वरसंयोगो योत्यर्भमुवलभ्यते ।

अन्यच्चबलितो यस्य संवादीचानुवादयपि ।
ग्रहोपन्यासविनयाससन्याससन्यासान्यासगोचरः
परिवार्यस्थातो यस्तु सोंशो स्याह दशलक्षणः ।।

*अर्थात*

अंश स्वर खालील दश लक्षणांनी युक्त असतो.
१) अंश स्वरामध्ये रागाचा निवास असायला हवा.
२) रागाचा आर्विभाव असायला हवा.
३) अंश स्वर मंद्र चे नियोजन करणारा असावा.
४) तार चे नियोजन करणारा असावा.
५) वेगवेगळया स्वरसमुहांमध्ये अंशाचा प्रयोग सर्वाधिक असावा तसेच त्याचे संवादी तसेच अनुवादी स्वर उर्वरीत स्वरांच्या तुलनेत प्रबळ असावे.

६, ७, ८, ९, १०) जो ग्रह, अपन्यास, विन्यास, संन्यास तसेच न्यास च्या माध्यमातुन संपूण्र जातीला समाविष्ट करून घेतो.

ही सर्व दहा लक्षणे रागामध्ये वादी - स्वराला सुध्दा लागू होतात. सर्वात प्रथम विशेषता, ज्या मध्ये रागाचे वास्तव्य असावे, अत्यंत महत्वपूर्ण आहे. आजच्या संदभामध्ये याचा अर्थ - ज्या स्वरामुळे रागाच्या स्वतंत्र अस्तित्वाची ओळख होते तो अंश किंवा वादी स्वर. राग - रसाच्या संदर्भात चर्चा करत असतांना आचार्य बृहस्पती म्हणतात ‘काही स्वर हा रागाचा स्थायी भाव आहे’.

*न्यास – अपन्यास :–*

न्यासचा अर्थ समाप्ती किंवा विश्रांती जी मधुरताजन्य, चित्ताकर्षक असेल. अश्या प्रकारची क्रिया ज्या स्वरावर अवलंबून असेल तो न्यास स्वर. जास्तीजास्त रागांमध्ये स्वर - विस्ताराचा शेवट हा षेजावरच होतो, खुप कमी असे राग आहेत की सौंदर्य निर्मितीच्या कारणामुळे शेवट वेगळया स्वरावर असेल उदा. मालगुनी मध्ये ध नि सा रे ग म्, मध्यमावर न्यास केल्या जातो त्यामुळे राग मधुर होतो. प्रचलित रागांमध्ये असे अनेक उदाहरणे शोधल्या जाऊशकतात. सामान्यतः षेज़ालाच न्यास स्वर असे म्हटल्या गेले आहे.

ज्या स्वरांमुळे रागामध्ये काही वेगळेपण सिध्द होते ज्या मुळे रागाचे आकर्षण वाढेल, त्या स्वराला अपन्यास असे म्हटल्या जाऊ शकते. राग ‘तीलक कामोद’ च्या लक्षण - गीतामध्ये - पं. मातखंडेजी म्हणतात.

चक्रवत नि को अपन्यास कर न्यारो ।

वेगवेगळया संयोगांनी निशाद स्वरावर थोडा ठहराव घेतल्यास तीलाककामोदची मधुरता वाढवते.

सा रे ग सा नि ........ अश्या प्रकारचा ठहेराव रागाची मधुरता वाढवितो. आणि हे स्वर राग - चलनानुसार निश्चित केल्या जावू शकतात.

*सन्यास – विन्यास :–*

सन्यास - विन्यास ही प्रक्रिया आणि याचे स्वरविषेषाचे चलन कोणत्याही रागाची आलापकारी बघून केल्या जावू शकते. ही ठहेरावाची प्रक्रिया आहे, या दृष्टी ने यांना समजण्यात यावे.

*अल्पत्व – बहुत्व :–*

या दोन लक्षणांचा संबंध आधीच्या सर्व लक्षणांशी जोडला जावूशकतो. विशेषकरून वादी स्वर सोबत याचा सरळ - संबंध येतो. जेव्हा एखादया रागाचा विस्तार केला जातो तेव्हा प्रत्येक स्वराचे एक निश्चित स्थान ठरविल्या जाऊ शकतो. ज्या स्वराचा प्रयोग अधिक होईल त्याला बहुत्वाचा नियम लागू होवू शकतो आणि ज्या स्वराचा प्रयोग कमी प्रमाणात केला जातो त्याला अल्पत्वाचा नियम लागू होतो. अल्पत्व आणि बहुत्व लक्षात घेत असतांना अभ्यास आणि लंघन या दोन कारणांचा विचार करावा लागतो. बहुत्वामध्ये अलंघन आणि अभ्यास तर अल्पत्वामध्ये लंघन आणि अनभ्यास हया गोष्टी महत्वाच्या आहेत.

*मन्द्र आणि तार :–*

हे दोनही लक्षम राग प्रकृती - शी सरळ संबंधित आहेत. अंश या लक्षणामध्ये पं. भरत यांनी स्पष्ट केले आहे, ‘रागाच्या नियमांचा निर्धारक हा वादी स्वर असतो. पूर्ण सप्तकाची विभागणी पुर्व आणि उत्तर या दोन भागामध्ये केलेली आहे. आणि याच आधारावर रागामध्ये मंद्र स्वर सा, रे, ग पैकी एक स्वर असेल तर त्या रागाचा जास्तीत जास्त विस्तार मंद्र आणि मध्य सप्तकातू केला जातो. ज्या रागामध्ये वादी स्वर पंचम किंवा धैवत असतो त्या रागाचा विस्तार मध्य आणि तार सप्तकात केला जातो. वादी स्वर जर मध्यम असेल तर विस्ताराचे दोन्ही प्रकार असू शकतात. पंचमाची भूमिका सुध्दा जवळपास तश्याच प्रकारची आहे.

***औत्व – षोत्व :–***

प्रत्येक रागाच्या आरोह – अवरोहात संपूर्ण सात स्वर लागतातच असे नाही. नियमानुसार रागामध्ये कमीत कमी पाच स्वर व जास्तीत जास्त सात स्वर असावेत. याच नियमाला औत्व – षोत्व असे म्हणतात. षोत्वामध्ये कोणता स्वर वर्जित असावा हे सरसताबोधक दृष्टीकोनातून ठरविल्या जाऊ शकते. आणि याच प्रकारे औत्वामध्ये कोणते दोन स्वर वर्जित केल्या जाऊ शकतात की त्यांच्या शिवाय रागतत्वाचे अवतरण होऊ शकेल हे लक्षात घ्यायला हवे. एका थाटाचे गणिताच्या आधारे ४८४ स्वर समुह बनु शकतात परंतु हे सर्व राग होवू शकत नाहीत कारण कोणताही रागात स्वर पाच असोत किंवा सहा परंतु याचा निर्णय राग तत्वाच्या भावनेवर अवलंबून असतो. थोडक्यात औत्व – षोत्व हे रागाचे सामान्य लक्षण आहे.

***सारांश :–***

राग लक्षणाच्या अभ्यासावरून असे निष्कर्ष येतात की एखादया रागाच्या फक्त आरोह – अवरोहावरून स्वरविस्तार केला तर ते राग गायन होणार नाही तो फक्त स्वरांचा बाजार होईल. बाजार हा शब्द प्रामुख्याने घेण्याचे कारण असे की बाजाराला कोणत्याही प्रकारची शिस्त नसते आणि गाण्यामध्ये शिास्तबध्दता असणे हे मनोरंजनाच्या दृष्टीने व रसनिर्मितीच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असते. राग लक्षणे किंवा नियम यांना गाण्याचे व्याकरणाचे नियम पाळले जातात तिथेच शुध्दतेची व निर्विकारतेची हमी देता येते. रागलक्षांमध्ये शास्त्रकार, पंडितांनी अतिशय सुक्ष्मतेने नियमबध्द केलेले असल्यामुळे गायकांचा गाण्याचा मार्ग सुचक झालेला दिसून येते. रागातील प्रत्येक स्वर हा राग नियमाप्रमाणे, रागांना गाईल्या गेला तरच रसनिर्मिती होईल अन्यथा या नाईलाजाने स्वर गायनच म्हणावे लागेल.

***संदर्भ ग्रंथ :–***

१) राग लक्षण अथवा राग के आवश्यक तत्व निबन्ध संगीत – सं. लक्ष्मीनारायण गर्गे
२) नाटय शास्त्र – भरत
३) संगीत के प्रमुख शास्त्रीय सिध्दांत – सुभारानी चौधरी

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org